
संत ज्ञानेश्वर विरचित



# चांगदेवपासष्टी



सुलभ मराठी श्लोकानुवाद - ह भ प श्री विजय पांढरे

ई साहित्य प्रतिष्ठान
सादर करीत आहे

# -चांगदेव पासष्टी -

## विरचिता- संत श्री ज्ञानदेव

## मराठी श्लोकमय अनुवाद-श्री.विजय पांढरे

# -चांगदेव पासष्टी -

## मराठी समश्लोकी अनुवाद : श्री.विजय पांढरे

(से.नि.मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग,महाराष्ट्र राज्य)
मु+पो.-लाखनवाडा ता. खामगांव जि.बुलडाणा पिन कोड-४४४३०३(म. रा.)
मोबाईल नं.-९८२२९९२५७८ /संपर्क – व्हॉट्सऍपक्र. 98229 92578
Email : vbpandhare@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क अनुवादकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी अनुवादकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act १९५७. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act १९५७ provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

# प्रकाशक: ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

Whatsapp- 9987737237

प्रकाशन : २ ऑगस्ट २०२२ (नागपंचमी शके १९४४)©esahity Pratishthan®2022


- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

# श्री.विजय पांढरे

(से.नि.मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, महाराष्ट्र राज्य)

संत साहित्याचे गाढे अभ्यासक. भावार्थ ज्ञानेश्वरी, अमृतानुभव इत्यादिंचे नवीन मराठीत श्लोकानुवाद प्रकाशित.



ज्ञानेश्वरी वाचा व ऐका. फ़क्त एका क्लिकवर. विनामूल्य. विनासायास.

चांगदेव पासष्टी हा शिष्यसंवाद होय. चांगदेव महाराज हे हृदयोगी होते. संत ज्ञानदेवांची कीर्ती त्यांच्या कानी आली आणि ज्ञानदेवांना पत्र लिहावे असे त्यांना वाटले. त्या पत्राची सुरुवात कोणत्या शब्दाने करावी म्हणून चांगदेव संभ्रमित झाले. कारण ज्ञानदेवांना चिरंजीव म्हणावे तर विधात्मक ज्ञान त्यांच्या मुखातून प्रगटते आहे आणि तीर्थरूप म्हणावे तर तो वयाने खूपच लहान आहेत. मायना काय लिहावा याचा निर्णय होईना. अखेर चांगदेवांनी कोरेच पत्र पाठवून दिले. ते पत्र मुक्ताबाईंच्या हाती आले आणि ती म्हणाली चौदाशे वर्षे जगूनही चांगदेव अजूनही कोराच आहे. त्यावर चांगदेवांचा कागद कोरा आहे म्हणजे शुद्ध आहे. मल, विक्षेप आणि दोषरहित आहे. म्हणून ’कोरिया

अक्षर उमटे कसोटी’ ते शुद्ध ज्ञानाचे अधिकारी आहेत. त्यांना ज्ञानोपदेश करा, असे निवृत्तीनाथ म्हणाले आणि चांगदेवांच्या पत्राला ज्ञानदेवांनी उत्तर म्हणून पासष्ट ओव्या लिहून पाठवल्या. तोच हा चांगदेव पासष्टी ग्रंथ होय. या पासष्ट ओव्या चांगदेवांना निजबोध करण्यासाठी पाठवल्या आहेत. या पासष्ट ओव्यांच्या ग्रंथ आकाराने लघु आहे. पण आशयघन आहे.

मूळ चांगदेव पासष्टीचा अर्थ न त्यागता सध्याच्या प्रचलित मराठी ,सुलभ ,सोप्या रसाळ भाषेत श्री पांढरे साहेबांनी केलेला अनुवाद,त्यामुळे मूळ चांगदेव पासष्टी समजण्यास मदत होते,असा असंख्य सुजाण वाचकांना आलेला अनुभव आहे.

# क्लिक करा आणि ऐका


ऑडिओ
सुलभ मराठी श्लोकानुवाद - ह भ प श्री. विजय पांढरे
संत ज्ञानेश्वर विरचित
चांगदेवपासष्टी
सुलभ मराठी श्लोकानुवाद - ह भ प श्री विजय पांढरे
गायन सौ. राधिका हंगेकर
संगीत – श्री. चंद्रमोहन हंगेकर



# -चांगदेव पासष्टी -

## विरचिता- संत श्री ज्ञानदेव

## मराठी श्लोकमय अनुवाद-श्री.विजय पांढरे

नमन त्या आत्मतत्वास ।
जे लपोनी प्रकटवि जगदाभास ।
मग करी तयाचाही नाश ।
तो अनुभवला जगदीश ।।१।।

प्रकटे तेव्हा न दिसे ।
लपता तो आभासे ।
ना प्रकट ना लपला असे ।
असा चिरंतन जो ।।२।।

विश्व होऊन घेत असे आकार ।
परी तो निराकार ।
काही नसोनिही जो आहे ।
अवघाच ॥३ ॥

सोन्यासी न येता उणे ।
सोने होत असे  दागिने।
तैसे तयाचे विश्व होणे ।
आपुलेने ।।४।।

सागर लाटा फेस ।
ते अवघेच उदक ।
तैसे अस्तित्व सर्व ।
चैतन्यची असे ॥५॥

सूक्ष्म हा परमाणु ईया ।
पृथ्वीपणे ही न जाई वाया ।
ती ही विश्व स्फूर्ती ।
जी झाकली न जाई ।।६।।

चंद्रकलांचे कारणे।
न होई चंद्राचे हारपणे।
अग्नि प्रकाशे दिपपणे।
परी ते अग्नीचेच असणे ।।७।।

अविद्याकारणे ।

द्रष्टा दृश्याचे प्रकटने ।

परी दर्शन दर्शनाचे ठायी ।

चिरंतन ।।८।।

जसे लुगड्याचे ठायी ।
नसे सुताविण अन्य काही ।
का मातीच्या भांड्याठायी।
असे मातीविण अन्य काही ।।९।।

द्रष्टा दृश्याचा हा खेळ ।
जे दर्शनच केवळ ।
ऐसा द्रष्टा दृश्याचा उकळ ।
ते दर्शनच  सकळ ॥१०॥

अलंकार नाव ज्याचे ।
ते असने सोन्याचे ।
नाना अवयवाचे असणे ।
जसे एकजीवा ठायीं ॥१३॥

तैसे शिवापासुन पृथ्वीपर्यंत ।
जे भासती पदार्थ ।
जे जे असे ते सर्व ।
चैतन्यच की ॥१२॥

नाही ते चित्र दावीति ।
परी असे केवळ भिंति ।
चैतन्यची ऐवी रीति ।
नांदे ते जगती ॥१३॥

ढेप जरी मोड़ी ।
न तुटे गूळाची ती गोडी ।
ऐसीच असे ही ।
अस्तित्व चैतन्याची जोडी ॥१४॥

घेऊनि विविध आकार ।
प्रकटते जैसे अंबर ।
तैसे विश्वाचे प्रकटन ।
चैतन्याठायी ।।१५।।

न लिंपिता सुख दुःख ।
नाना आकारांचा आभास ।
तैसे होत असे आपण ।
आपल्या सन्मुख ॥१६॥

दृश्याचे ते जन्मणे ।
द्रष्ट्याचे कारणे ।
जैसे प्रतिबिंबाचे प्रकटणे ।
बिंबत्वा कारणे ॥१७॥

तैसे आपुल्याच ठायी ।
उठवी दृश्याची आवई ।
ऐसी प्रकटे त्रिपुटी ।
त्या चैतन्याच्या पोटी ।।१८।।

सुतचिये गूंजे ।
आत बाहेर नाही दूजे ।
तैसे त्रिपुटीचे ठायीं ।
नाही चैतन्यावीण अन्य काही ।।१९।।

आपुलेच मुख
जेव्हा दर्पणी दिसत असे l
व्यर्थता प्रतिबिंबाची तेव्हा ।
मनी आकळत असें ।।२०।।

तैसे न करता भेदाभेद ।
चैतन्य त्रिपुटी माजी अभेद ।
तैसे चैतन्यचं कारण ।
जगाच्या उत्पत्तीस ॥२१॥

उभारून दृश्याचा पसारा ।
द्रष्टा येई अवतारा ।
द्वैताचा होणे भास ।
तोचि अविद्येचा वास ।।२२।।

दृश्य जेधवा नाही ।
तेव्हा दृष्टिमाजी काही नाही ।
दृश्याविण  का कधी ।
द्रष्टत्वाचा जन्म होई ॥२३॥

म्हणून दृश्याचे उभारणे ।
तेचि द्रष्टत्वाचे जन्मणे ।
दृश्याचे सरता भास ।
द्रष्टा ही मग खलास ।।२४।।

तिघे येता एकेठायी ।
भास अस्तित्वाचा होई ।
ऐसी त्रिपुटीची कहाणी ।
एका अद्वैत ठिकाणी ।।२५।।

दर्पण देखण्या आधी ।
मुख मुखाचे ठिकाणी ।
जे दर्पणी  दिसे ।
ते कधी का अन्य असे ॥२६॥

दृश्याशी त्या देखता ।
द्रष्ट्याचा भास आता ।
तैसा दृश्य द्रष्ट्याचा भास ।
जो चित्ताचा विलास ।।२७।।

म्हणून दृश्य द्रष्ट्याचे कारणे ।
द्वैताचे प्रकटने ।
तैसे भासा होती भास ।
ऐसी त्रिपुटी ती खास ।।२८।।

वाद्या अंगी जैसा ध्वनि ।
वा काष्टाअंगी अग्नी ।
तैसे अस्तित्वा अंगी ।
चैतन्यची असे ॥२९॥

जे उच्चारता न ये ।
जाणता न जाणो जाये ।
तयाचें जे अनंतपण ।
जैसे ते गगन ॥३०॥

पाहण्या आपुलिया बुबुळा ।
डोळा असे आंधळा।
तैसे चैतन्याची जाणीव ।
चैतन्यास नाही ॥३१॥

स्वयेची जी जाणीव ।
तेथे जाणिवेची उणीव ।
त्या जाणिवेची जाणीव ।
जाणिवेस नाही ।।३२।।

चारी वाचा होता मौन ।
मौनात प्रकटते आत्मज्ञान ।
चारी वाच्या न झाल्या मौन ।
मग कशाचे आत्मज्ञान॥२३॥

जगी दिसे नानातत्व ।
परी सर्वाठायी एकतत्व ।
सागरी लाटा अनेक ।
परी तया ठायी पाणी एक॥ ३४॥

तैसी ही द्वैत विरहित ।
जाणीव जी अद्वैत ।
त्या जाणिवे ठायी ।
जाणिवेविण  न अन्य काही ।।३५।।

कोणी नसताही असणे ।
तेथे न अन्य कोणाचे भासणे ।
विषयी विषयाची आटी ।
ती अद्वैताच्या काठी ॥३६॥

ऐसा तू पुत्र ईश्वराचा ।
रवा जैसा कापूरचा ।
तैसे मज तुज ठायी ।
एक चैतन्यच पाही ॥३७॥

ज्ञानदेव म्हणे

तुझी माझी चर्चा तैसी ।

ती तळहाताची मिठी ।

तळहातासी जैसी ॥३८॥

शब्दाने शब्द ऐकावा ।
स्वादाने स्वाद चाखावा ।
का प्रकाशाने पहावे ।
प्रकाशास जसे ।।३९।।

सोन्यास सोन्याचा मुलामा ।
का मुखानेच व्हावा आरसा ।
तैसा माझा तुझा संवाद ।
चांगदेवा ॥४०॥

गोडीने चाखता गोडीस ।
काय वर्णावी मिठास ।
परस्परांचा तो संवाद ।
तैसाच की ॥४१॥

सखया तुझ्या भेटीस ।
माझे मनी आहे आस ।
परी द्वैत भेटीस ।
मन असे रे उदास ॥४२॥

घ्यावे वाटे तुझें दर्शन ।
तुझ्या रूपा येते मन ।
परी ते होईल अद्वैत ग्रहण ।
ऐसे वाटते रे मला ।।४३।।

करता बोलता कल्पिता ।
वा न करता न बोलता न कल्पिता ।
ऐसी द्वैताची उपजणी ।
नाही तुझ्याही ठिकाणी ।।४४।।

चांगया तुजसाठी ।
कर्म अकर्म न व्हावे ।
तू काहीही म्हण ।
मला मीपण न सहावे ।।४५।।

सागराचा घेण्या ठाव ।
मिठाने सागरी निघावं ।
होता सागराशी एकजीव ।
कोणी कोणास मापावं ॥४६॥

चांगया तुज चिंतीता ।
तू मी एक आता ।
ऐसी तुझी माझी एकता ।
न ये ती वर्णिता ॥४७॥

जो अविद्येत जागला ।
त्याचा अहंभाव गेला ।
तैसा तुला आठवता ।
द्वैत भाव गेला आता ।।४८।।

लागता समाधी ।
गेली नामरूपाची उपाधी ।
परी आत्मतत्वाचे राज्य ।
नित्य चिरंतन राही ।।४९।।

तैसा मी तुला पाही ।
जेथे मी तू-पण नाही ।
सरता द्वैताचा भास ।
उरे अद्वैत निराभास।।५०।।

द्रष्टा आणि दृश्य ।
दोन्ही असे रे दर्शन ।
ऐसे दर्शनाचे दर्शन ।
दर्शनासी ।।५१।।

तैसे प्रकटले आत्मतत्व ।
जे मुळात अद्वैत ।
द्वैताची सरता रात ।
उगवे अद्वैत पहाट ॥५२॥

संपता मी-तू पणा ची कास ।
येई अद्वैत उदयास ।
मग अद्वैताचा वास ।
अद्वैता ठायीं ।।५३।।

स्वादाचेनि मिसे ।
स्वादच जेविजे जैसे ।
का दर्पणाचेनि मिसे ।
द्रष्टाच दर्पणी दिसे ।।५४।।

विरता चारी  त्या वाचा।
अप्रमेय आले प्रमेयासी ।
तेव्हा अद्वैताचे दर्शन ।
अद्वैताशी॥५५॥

चांगया हे जाणून रहस्य ।
तू विझू दे स्वतःस ।
मग दिपाचे ज्ञान दीपास ।
तैसा तू येई तुझ्या अनुभवास ॥५६॥

असे होता साहस ।
तू पात्र आत्मज्ञानास ।
मग तुझी होईल ती भेट ।
तुझ्यासीच॥५७॥

त्या प्रलय ठिकाणी ।
सर्व दूर पाणीच पाणी 1
उगम आपला गिळोनि ।
संपे भ्रमाची कहाणी ।।५८।।

ज्ञानदेव म्हणे नामरूपाविण ।
अस्तित्व तुझे चिरंतन ।
त्या आत्मरूपास जाणून ।
सुखीया तू होसी ॥५९॥

चांगया पुढती पुढती ।
घरा आलीया ज्ञानसंपत्ती ।
ज्ञेयाचा होता अंत ।
प्रगटे ज्ञान मूर्तिमंत ।।६०।।

चांगया तूझिया निमित्तानं ।
श्रीनिवृत्ती माउलींनं ।
मजठायी प्रकटविल ।
आत्मतत्वाच निरूपण ।।६१।।

ज्ञाना म्हणे चांगयास ।
आपण दोन आरसे डोळस ।
जाणता स्वतःस ।
झालो पाहा एक रस ॥६२॥

अशा या रीतीनं।
जर ओव्या केल्या दर्पण।
होता आत्मतत्वा लीन ।
सापडे सुखाची ती खाण ।।६३।।

ते आत्मतत्व काय असे ।
ते आत्मतत्व कैसे दिसे ।
जे आपणची असे ।
ते होइजे की तू ॥६४॥

निद्रेपलीकडील निद्रा होणे ।
जागृती गिळोनी जागणे ।
तैसे आत्मतत्वाचे हे विवेचन ।
ज्ञानदेव म्हणे ।।६५।।

मूळ चांगदेव पासष्टीचा अर्थ न त्यागता सध्याच्या प्रचलित मराठी, सुलभ, सोप्या रसाळ भाषेत श्री पांढरे साहेबांनी केलेला अनुवाद, त्यामुळे मूळ चांगदेव पासष्टी समजण्यास मदत होते, असा असंख्य सुजाण वाचकांना आलेला अनुभव आहे.

अध्यात्मावर अशी अनेक मराठी पुस्तके वाचण्यासाठी भेट द्या.

वेद, उपनिषदे, भगवदगीता, तुकाराम गाथा, ज्ञानेश्वरी, संतसाहित्य, संपूर्ण १०००० पानी महाभारत, रामायण, कृष्णायन अशी महत्त्वाची पुस्तके वाचण्यासाठी फ़क्त एक क्लिक करा.